Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

Original Article

# डॉ. रखमाबाई राऊत यांच्या सामाजिक आणि वैद्यकीय कार्याचा परिचय इ.स. १८६४ ते १९५५

**सतीश पाटीलबा चव्हाण[1], प्रा. डॉ. सुरेश स. माळशिखरे[2]**
[1]आचार्य पदवी-संशोधक,शि.प. मं. ता. म. कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली ता चिखली जि.बुलढाणा
[2]इतिहास विभाग प्रमुख, शि.प्र. मं. ता. म. कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली ता. चिखली जि बुलढाणा
**Email**; -Satishchawhan3@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-170940
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 9
Pp. 216-218
September 2025
**Submitted:** 22 Aug. 2025
**Revised:** 2 Sept. 2025
**Accepted:** 21 Sept. 2025
**Published:** 30 Sept. 2025

**सारांश**

*एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजात स्त्री शिक्षण, विवाह संस्था आणि स्त्री-पुरुष समानतेविषयी परिवर्तन घडून येत होते. या सामाजिक पार्श्वभूमीवर डॉ. रखमाबाई राऊत (1864 – 1955) यांनी स्त्री-मुक्ती, शिक्षण आणि वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. बालविवाहाच्या विरोधात त्यांनी दाखविलेला धैर्यशील आणि न्यायनिष्ठ लढा हा भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय ठरला. त्यांनी इंग्लंडमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन भारतात परत येत महिलांच्या आरोग्यसेवेसाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. सुरत व राजकोट येथे त्यांनी वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा दिली आणि स्त्रियांना शिक्षण, वाचन-लेखन, शिवण-भरतकाम यांसह आरोग्याचे ज्ञान दिले. आरोग्यजागृतीसाठी त्यांनी 'बालक मंदिर' आणि 'माळवी हॉस्पिटल' सारख्या उपक्रमांची स्थापना केली. इन्फ्लूएंझा साथीतील सेवेबद्दल त्यांना ब्रिटिश सरकारचा कायसर-ए-हिंद पुरस्कार आणि रेडक्रॉस पदक मिळाले. सामाजिक न्याय, शिक्षण आणि स्त्री-स्वातंत्र्याच्या कार्यातून त्यांनी स्त्रियांना आत्मविश्वास आणि स्वाभिमान दिला.*

***मुख्यशब्द :** डॉ. रखमाबाई राऊत, स्त्री-मुक्ती चळवळ, वैद्यकीय सेवा, सामाजिक सुधारणा, बालविवाह, स्त्री शिक्षण, रोग्यजागृती, महिला सक्षमीकरण, कायसर-ए-हिंद पुरस्कार, सुरत वैद्यकीय सेवा, स्त्री-पुरुष समानता.*

## प्रस्तावना:-

एकोणीसावे शतक हे समाज परिवर्तन घडवून आणणारे होते. या कालखंडात समाजसुधारणेला व कार्यसुधारणेला एक चालना मिळाली होती. स्त्री विषयी नवसंवेदना समाजात जाग्या होत होत्या. स्त्री शिक्षणाचे महत्व तर समजत होतेच, त्या जोडीला बालविवाह संदर्भात पुनर्विवाहाचा विचारही पुढे येत होता. परंतु एकंदर वातावरण सनातनी व रुढीप्रिय असल्याने स्त्री विषयी विचार समाजापुढे सातत्याने मांडव्याची गरज होती, या कालखंडात स्त्रीमुक्ती चळवळीच्या पुरस्कर्ता म्हणून व एक कर्तृत्वान स्त्री म्हणून डॉ. रखमाबाई राऊत यांचे नाव घेणे ऐतिहासीकदृष्ट्या महत्वाचे दिसून येते. स्त्री डॉक्टर म्हणून त्यांनी केलेल्या सामाजिक आणि वैद्यकीय कार्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

## बालविवाह

डॉ. रखमाबाईचा विवाह दादाजी सोबत वयाच्या ११ व्या वर्षी झाला होता, या काळमध्ये बालविवाह प्रथा अस्तित्वात होती.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सतीश पाटीलबा चव्हाण, आचार्य पदवी-संशोधक, शि.प. मं. ता. म. कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली ता चिखली जि.बुलढाणा*

**How to cite this article:**
*चव्हाण, . सतीश . पाटीलबा ., & माळशिखरे, . सुरेश . स . (2025). डॉ. रखमाबाई राऊत यांच्या सामाजिक आणि वैद्यकीय कार्याचा परिचय इ.स. १८६४ ते १९५५. Journal of Research and Development, 17(9), 216–218. https://doi.org/10.5281/zenodo.17473625*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.17473625
OPEN ACCESS

मुलगी न्हाती झाल्यावर सासरी नांदायला पाठवत, परंतु रखमाबाईने सासरी नांदायला जाण्यास नकार दिला.पती अडाणी, दारिद्री आणि रोगट शरीराचा होता, यामुळे रखमाबाईला नवऱ्यासोबत संसार करण्याची इच्छा नव्हती. दादाजीने यासाठी कोर्टात दावा दाखल केला ( १८८४ ), खालच्या कोर्टात प्रथम रखमाबाईच्या बाजूने निर्णय आला. पुढे हे प्रकरण हायकोर्टात गेले. हायकोर्टात हिंदू कायदा, भारतीय रुढी-परंपरा नुसार नवऱ्याकडे नांदन्यास जाण्याचा निर्णय दिला, अथवा कैदेची शिक्षा व प्रतीवादीचा खर्च देण्याचे आदेश दिला. परंतु विल्सन कॉलेजचे प्राचार्य वर्डस्वर्थ यांनी रखमाबाई 'डिफेन्स' कमिटी स्थापन करून व अन्य समाजसुधारकांच्या पुढाकाराने हे प्रकरण दादाजीला योग्य मोबदला देऊन मिटविण्यात आले.

**वैद्यकीय शिक्षण :-**

रखमाबाई १८८९ मध्ये वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेल्या आणि त्यांनी एम्. डी. ची पदवी घेतली १८९५ मध्ये त्या भारतात डॉक्टर म्हणून परतल्या. मुंबईत कामा हॉस्पीटलमध्ये सहा महिने काम केले. सुरत येथे मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले, पुढे राजकोट येथे वैद्यकीय सेवा दिली. डॉ. रखमाबाईचा डॉक्टर बनण्याचा हा प्रवास खुपच खडतड व संघर्षाचा होता. डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या नंतर दिर्घकाल वैद्यकीय सेवा देणाऱ्या त्या मुंबईप्रांतात व महाराष्ट्रातील प्रथमच महिला होत्या.

**वैद्यकीय सेवा आणि समाजसेवा:-**

डॉं रखमाबाई यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केल्याचे दिसते. त्यांनी समाजाची निष्ठेने सेवा करून डॉक्टरची प्रतिष्ठा जपली. त्याकाळी हॉंस्पीटलमध्ये बाळंतपण करण्यास स्त्रीया नकार देत,यामुळे डॉ. रखमाबाईनी एका शेळीचे सुखरुप बाळंतपण हॉस्पीटलमध्ये करून लोकांना आरोग्याचे महत्व सांगीतले. आजही सुरत येथील माळवी हॉस्पीटल हे डॉ. रखमाबाई यांच्या नावाने अविरत सेवा देत आहे. बाळंतपणासाठी येणाऱ्या स्त्रीयांना चाळीस दिवस दवाखाण्यात थांबावे लागत असे, त्यामुळे त्यांच्या सोबत असणाऱ्या लहान मुलामुलीसाठी त्यांनी 'बालक मंदीर' सुरु केले त्याला माळवी बालक मंदिर असे नाव दिले.स्त्रीयांना आरोग्याच्या शिक्षणासोबतच त्यांना वाचन-लेखन, शिवनकाम व भरतकाम शिकवत, स्त्रीयांच्या मनात रखमाबाईबद्दल आदराचे स्थान निर्माण झाल्याचे दिसते.१९०७ साली सुरत येथे प्रांतीय कॉंग्रेस भरली होती, तिच्या स्वागत समितीच्या चिटणीस पदावर रखमाबाई होत्या.

इ.स. १९२० महिला पुण्यात मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे म्हणून आंदोलन झाले, त्यावेळी आपल्या मांगणीला पाठिंबा मिळविण्यासाठी रमाबाई रानडे यांनी ठिकठिकाणी महिला मंडळाच्या सभा घेतल्या होत्या, त्यावेळी रखमाबाईनी सुरत येथे महिला सभेचे आयोजन केले होते.आर्य महिला समाजाच्या सदस्या म्हणून रखमाबाईनी महिला शिक्षण, बालविवाह भाणि स्त्रीयांच्या निर्बंधाविरुध्द कार्य केले. यासाठी पडदा मोहिम सुरू केली.

**वैद्यकीय क्षेत्रातील कार्य :-**

सुरत येथे आलेल्या इन्फ्युएंझाच्या साथीत केलेल्या लोकोपयोगी कार्यासाठी रखमाबाईला कैसर ए-हिंद पुरस्कार ब्रिटीश सरकार ने देऊन गौरविले होते. 1909 मध्ये डॉ. बी. एच. बॅनेट ( B. H. Bennett) यांच्या सहकार्याने A CASE OF MYXOMA OPERATED UPON AT THE WOMEN'S HOSPITAL, SURAT या नावे मिकसोमा नावाच्या टयुमखर संशोधन केल्याची नोंद मेडिकल गॅझेट मधे दिसते. पहिल्या महायुद्धातील भारतातील वैद्यकीय कार्यासाठी रेडक्रॉस सोसायटीने त्यांना पदक देऊन सन्मानीत केले होते. भारतीय स्त्रीयांना परिचारिकाचे प्रशिक्षण देण्यासाठी रखमाबाई यानी सौराष्ट्रातील महाराजा व नवाबातील संपर्कात असलेल्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या सहकार्यातून प्रशिक्षण दिले. ग्रामीण भागातील बाळतपण करणाऱ्या दाई नाही त्या आरोग्याची काळजी व सुरक्षीत बाळतपणाची माहिती देत.१९२९ मध्ये त्या निवृत्त झाल्या, त्यानंतर ही त्यांनी आरोग्य, शिक्षण, स्त्रीपुरुष समानता यासाठी त्या शेवटपर्यंत कार्यरत राहिल्याचे दिसते. वयाच्या ९१ व्या वर्षी २५ सप्टेबर १९५५ रोजी मुंबईतील फ्रेंच पुलाजवळील त्यांच्या निवासस्थानी त्यांचे निधन झाले.

**निष्कर्ष:-**

रखमाबाई यांनी आपल्या कर्तृत्वातून समाजजीवनात आपला ठसा उमटविला, धैर्य, संयम, व संघर्ष या त्यांच्या जीवनातील तत्त्वामुळे त्यांनी स्त्रीयांना समाजामध्ये त्यांचे आधिकार मिळविण्यासाठी प्रयत्नशील केले.वेळप्रसंगी बंड करून, सामाजिक अव्हेलना सहन करून

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-9| September 2025

त्यांजी 'हिंदू लेडी' या नावाने स्त्रीयांच्या प्रश्नांना प्रथमच सर्वासमोर मांडण्याचे धाडस दाखविले. स्त्रीयांच्या प्रश्नांबाबत सर्वांना जाहिरपणे आव्हान दिले. आणि निष्ठेने आरोग्य सेवा तळागाळीतील स्त्रीया व गरीबांना देऊन खऱ्या अर्थाने वैद्यकीय सेवेचे व्रत शेवट पर्यंत जपले.

**तळटिपा :-**

1) पांढरे निला, महाराष्ट्रातील स्त्री सुधारक, उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००९, पृ. २०, २१.

2) गोपुजकर प्रतिभा, 'कर्तृत्वशालिनी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००७, ५, ८२.

3) केतकर सीमा, डॉ. रखमाबाई, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे, १९९७, पृ १, २०.

4) इंडियन मेडिकल गॅझेट,अहवाल, १९०२, पृ. १८०

5) चन्द्र सुधिर, रखमाबाई: स्त्री आधिकार और कानून, नई दिल्ली, २०१२.

6) फडके य. दि., शोध : बान-गोपाळांचा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ४०.

7) वर्दे मोहिनी, डॉ. रखमाबाई एक आर्त, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१७.

8) गठाळ एस. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१८, पृ. २२४.